सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**NEP CREDIT PATTERN**

**Academic Year – 2024-25**

# व्यक्तिमत्त्व विकास आणि भाषा

# F.Y.B.Com

OE/101/Marathi

संदर्भ ग्रंथ : संपादक प्रा.डॉ.मंगल डोंगरे

**सत्र - १**

**अभ्यासक्रम (लेखी परीक्षा गुण-५०)**

**विषय : OE/101/Marathi**
**घटक १**

**व्यक्तीमत्त्व विकास आणि भाषा**

१.१) व्यक्तिमत्त्व संकल्पना व स्वरूप
१.२) व्यक्तिमत्त्व विकासाचे जीवनातील स्थान व महत्त्व
१.३) व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकणारे घटक.

**घटक २**

**व्यक्तिमत्त्व विकासातील भाषेचे स्थान**

२.१) भाषा म्हणजे काय?
२.२) व्यक्तिमत्त्व विकासातील भाषेचे स्थान व महत्त्व
२.३) भाषा आणि व्यक्तिमत्त्व यांचा सहसंबंध

सदर सत्राला Practical नाही

**अंतर्गत परीक्षा १५ गुण व विद्यापीठ परीक्षा ३५ गुण असे एकूण गुण ५०**
**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप**

**विद्यापीठ सत्र परीक्षा - एकूण गुण-३५ वेळ-२ तास**

प्रश्न-१) दोन पैकी एका प्रश्नाचे उत्तर लिहा. (शब्द मर्यादा-३००)- १५गुण

प्रश्न-२) दोन पैकी एका प्रश्नाचे उत्तर लिहा. (शब्द मर्यादा-३००)- १५गुण

प्रश्न-३) दोन पैकी एक टीप लिहा. (शब्द मर्यादा-१००)- ५गुण

अंतर्गत मूल्यमापन - गुण-१५

लेखी परीक्षा /मौखिक परीक्षा / प्रकल्प लेखन / क्षेत्रिय लेखन (माहितीच्यासंकलनासह) क्षेत्रभेट-अहवाल/घटक चाचणी / समूह चर्चा / ग्रंथालयीन कार्य / सादरीकरण / प्रश्न मंजुषा / गृहपाठ / विस्तार कार्य / संशोधन प्रकल्प / खुले पुस्तक परीक्षा (वरीलपैकी एक पर्याय निवडा.)

अभ्यासक्रमाची गुण विभागणी

विद्यापीठ लेखी परीक्षा -३५

महाविद्यालय अंतर्गत परीक्षा -१५

एकून गुण - ५०

**सत्र-१**

**अनुक्रमणिका**

**घटक १) व्यक्तिमत्त्व विकास आणि भाषा**
• प्रास्ताविक
• भाषा आणि संज्ञापन कौशल्य
१.१) व्यक्तिमत्त्व संकल्पना व स्वरूप
• व्यक्तिमत्त्वाच्या व्याख्या
• व्यक्तिमत्व विकासातील महत्वाचे घटक
१.२) व्यक्तिमत्त्व विकासाचे जीवनातील स्थान व महत्त्व
• व्यक्तिमत्व विकास
• व्यक्तिच्या सर्वांगीण विकासातील महत्वाचे घटक
• ज्ञान व्यवस्थापनाचे महत्व
• ताण तणावाचे व्यवस्थापन व व्यक्तिमत्व विकास
१.३) व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकणारे घटक.
• व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप
• व्यक्तिमत्त्व विकास कलाविष्कार व छंद
• व्यक्तिमत्त्व व शिक्षण
• व्यक्तिमत्त्व आणि अभिरुची
• व्यक्तिमत्त्व आणि नेतृत्त्व
• व्यक्तिमत्त्व व आरोग्य

**घटक २) व्यक्तिमत्त्व विकासातील भाषेचे स्थान व महत्त्व**

२.१) भाषा म्हणजे काय?
२.२.१) भाषिक कौशल्य आणि व्यक्तिमत्व विकास
अ) श्रवण कौशल्य
ब) संभाषण कौशल्य
क) वाचन कौशल्ये
ड) लेखन कौशल्य
ई) भाषण कौशल्य
२.३) भाषा आणि व्यक्तिमत्त्व

## घटक-१ व्यक्तिमत्त्व विकास आणि भाषा

### प्रास्ताविक

आपल्या भावना, विचार, मते, दृष्टिकोन, अभिरुची, अभिवृत्ती इतरांना सांगण्यासाठी आपण भाषेचा वापर करतो. आपण शब्दांच्या माध्यमातून कथा सांगतो, दृष्टांत, उदाहरणे, दाखले देतो. आपल्या मनातील आशय सांगण्याचा प्रयत्न करतो. व्यक्तीला आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी भाषा हे परिणामकारक साधन आहे. म्हणून भाषा हे व्यक्तिमत्व विकासाचे अधिष्ठान समजले जाते. भाषा ही समाजाची जीवन वाहिनी आहे. व्यक्तिमत्त्व विकास या संज्ञेत बौद्धिक, मानसिक, शारीरिक, सामाजिक, नैतिक विकास आध्यात्मिक विकास या घटकांचा समावेश होतो.

भाषेच्या माध्यमातून व्यक्तीला आत्मप्रकटीकरण करता येते. ज्या व्यक्तीची भाषा उत्तम असते, त्याचे व्यक्तिमत्त्व असामान्य ठरते. आजच्या जागतिकीकरणाच्या व नव्या माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भाषिक क्षमता व व्यक्तिमत्व विकासाला फार महत्त्व आहे. ज्याला यशस्वी जीवन जगायचे आहे. त्यासाठी उत्तम व्यक्तिमत्व व चांगली भाषिक कौशल्ये हवीत. व्यक्तिमत्व समृद्ध करण्यासाठी व्यक्तीच्या अंगी काही भाषिक कौशल्य असावी लागतात. भाषेमुळे व्यक्तिमत्व असामान्य ठरते. उत्तम वक्तृत्व, नाट्याभिनय, काव्यगायन यामध्येही भाषेच्या निवेदन शैली प्रमाणेच आशयाला महत्त्व आहे "काय सांगितले आणि कसे सांगितले" या दोन्ही बाजू भाषेत महत्त्वाच्या आहेत.

समाजाची संस्कृती भाषेमुळेच विकसित होत असते. मानवाचा कोणताही व्यवहार भाषेशिवाय होत नाही. व्यक्ती भाषेमुळे सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न होते. भाषेद्वारे व्यक्ती आपल्या मनातील आशय एकमेकांना कळवीत असते. प्रत्येक व्यक्तीची भाषा स्थळ, काळानुसार बदलत असते. तसेच नोकरी व्यवसायानुसार भाषा वेगवेगळी बोलली जाते. उदा. डॉक्टर, वकील, शेतकरी, व्यापारी इत्यादी व्यवसायांची भाषाशैली वेगवेगळी असते.

### भाषा आणि संज्ञापन कौशल्य

प्रत्येक व्यक्तीत बोलण्याची व ऐकण्याची क्षमता जन्मताच असते. व्यक्तीच्या मनोवृत्तीनुसार, सामाजिक स्तरानुसार, तिच्यावर झालेल्या संस्कारानुसार व्यक्ती भाषेचे आदान-प्रदान करीत असते. भाषा ही व्यक्तीमनाचा आरसा असते, त्यात समाजाचे प्रतिबिंब पडते. भाषा ही सामाजिक व सांस्कृतिक संस्था आहे. भाषेच्या वापराबाबत काही संकेत असतात. भाषेद्वारे व्यक्ती एकमेकांशी संपर्क साधतात. माहिती, ज्ञान, अनुभव, विचार, भावना यांची देवाण-घेवाण भाषेच्या माध्यमातून होत असते.

समाजात भाषेमुळे योग्य संदेशाने वहन होते. मानवी समाज व भाषा यांचा संबंध अतूट असतो. तसेच प्रत्येक व्यक्तीची भाषा शैली वेगवेगळे असते. भाषेचा संबंध समाजातील सर्वच क्षेत्राशी येतो. एकाच व्यक्तीची भाषा त्याच्या सामाजिक भूमिकेनुसार बदलत असते. उदा. एखादी स्त्री 'आई'च्या भूमिकेत असेल, तेव्हा तिची लहान मुलाशी बोलतानाची भाषा वेगळी असते. ती स्त्री जेव्हा इतर व्यक्तींशी बोलते. तेव्हा तिची भाषा बदलते. आर्थिक, शासकीय, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय , सामाजिक क्षेत्रात भाषा संपर्क साधत असते. संपर्क व्यवहाराचे प्रभावी साधन म्हणून भाषेची निर्मिती झाली आहे. प्रत्येक व्यक्तीच्या बोलण्यातून तिच्या व्यक्तिगत आवडीनिवडी व्यक्त होत असतात.

भाषेचे अस्तित्व समाजाच्या मान्यतेशिवाय सिद्ध होत नाही. संपर्क व्यवहाराचे भाषा हे प्रभावी साधन आहे. भाषा हे विचाराचे व संस्कृतीचे प्रतिबिंब आहे. मानवाची प्रगती, तंत्रज्ञानाचा विकास, कला, वाङ्गय तत्वज्ञान, शोध, संशोधन ही मानवी जीवनाची ठळक अंगे भाषेमुळे शक्य झाली. कुटुंबाप्रमाणे, शिक्षक, विविध संस्था यांच्या प्रभाव व संस्कारातून व्यक्तीच्या विकासाला दिशा मिळते.

व्यक्ती सामाजिक मूल्ये, मानदंड, नीतीनियम यांना अनुसरून वर्तन करते, त्यानुसार व्यक्तीला सामाजिक स्वीकृती व प्रतिष्ठा प्राप्त होते. व्यक्तीला संस्कारित करणे, मूल्यांची जोपासना करण्यास भाग पाडणे, समाजाच्या अपेक्षांनुसार वळण लावणे, सामाजिक नीती नियमांचे पालन करण्याची सवय लावणे,

सामाजिक स्वीकृतीसाठी व्यक्तीला तयार करणे यासाठी कुटुंब मित्र, शाळा, शैक्षणिक संस्था आणि प्रसारमाध्यमे यांची भूमिका महत्त्वाची आहे.

**१.१) व्यक्तिमत्वः- संकल्पना व स्वरूप**

एखादी व्यक्ती म्हटले की, आपल्यासमोर डोळयांपुढे विशिष्ट शरीरयष्टी असलेली कोणतीही व्यक्ती उभी राहते. तिचे रूप, शारीरिक ठेवणे, तिची वैशिष्ट्ये, वर्तन यांचा आपण विचार करतो. पण आपण जेव्हा 'व्यक्तिमत्त्व' असा शब्द उच्चारतो तेव्हा त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष ठसा आपल्या मनावर उमटतो. प्रत्येक व्यक्तीला व्यक्तिमत्व असते. व्यक्तीचे दिसणे, बोलणे, तिच्या सवयी, स्वभाव, वैशिष्ट्ये, आकर्षक शरीरयष्टी, चारित्र्य याशिवायही अनेक घटकांचा समावेश व्यक्तिमत्वात होतो. इंग्रजीत व्यक्तिमत्वाला असणारा 'पर्सनॅलिटी' हा शब्द 'परसोना' म्हणजेच 'मुखवटा' या शब्दापासून तयार झाला आहे. त्यामुळे योग्य वेळी योग्य तो मुखवटा घालण्याची कला व्यक्तीमत्त्वाशी निगडित आहे. त्यामुळे 'व्यक्तिमत्व' या संकल्पनेत व्यक्तीच्या शारीरिक जडणघडणी बरोबरच मानसिक घडणीचाही समावेश होतो.

ऑलपोर्ट यांच्या मते, व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक पैलूंचे चैतन्यपूर्ण संघटन म्हणजे व्यक्तिमत्त्व असते. त्यामध्ये वैशिष्ट्यपूर्व विचार व वर्तनाची अपेक्षा असते. व्यक्तिमत्वाचे रंग, रूप, मोहकता, प्रसन्नता, भारदस्तपणा, प्रभावीपणा, प्रसन्नता ही विशेषणे व्यक्तिमत्त्वाला दिली जातात. हे व्यक्तीचे बाह्य गुण आहेत. भावना, व्यक्तीस्वरूप, सवयी, जीवनशैली, स्थिरभाव प्रेरणा यांनाही व्यक्तिमत्त्वात महत्त्व आहे. अंगयष्टी, उंची कपडे, दाग-दागिने यामुळे व्यक्तिमत्व खुलते. पण या वरवरच्या गोष्टी झाल्या. त्या व्यक्तीमध्ये संवादकौशल्य, भाषेचेज्ञान, वागण्याचीपद्धत, निर्णयक्षमता, विचारशक्ती, शिक्षण, नोकरी, व्यवसाय, राहणीमान या सर्व गुणांची सरमिसळ असेल तर त्यास व्यक्तिमत्व संबोधतात.

**व्यक्तिमत्त्वाच्या व्याख्या**

१) व्यक्तीचे दिखाऊ किंवा बाह्य स्वरूप म्हणजे व्यक्तिमत्त्व.

२) जीवनमान, व्यक्ती व सामाजिक व भौतिक वातावरण यांच्या परस्परक्रियेतून प्रकट होणारे व्यक्तिवैशिष्ट्यांचे समग्र रूप म्हणजे व्यक्तिमत्व होय.

३) बदलत्या परिस्थितीनुसार मनुष्याच्या वर्तनात जे विविध बदल घडतात, त्यानुसार व्यक्तीचे घडणारे वर्तन म्हणजे व्यक्तिमत्त्व होय.

४) माणसाची शरीरयष्टी, त्याची वर्तनपद्धती, अभिरुची, अभिवृत्ती, बौद्धीक सामर्थ्य, त्याच्या प्रेरणा पात्रता यांच्या आकृतीबंधाला व्यक्तिमत्त्व म्हणतात. यामधून त्या व्यक्तीचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व लक्षात येते.

'व्यक्तिमत्त्व' ही संकल्पना साधी, सरळ व सहज नसून क्लिष्ट व गुंतागुंतीची आहे. व्यक्ती वेगवेगळया प्रसंगात कशी व्यक्त होते, यावर व्यक्तीचे व्यक्तिमत्व समाज ठरवतो. व्यक्ती ही स्वतंत्र असली तरी ती समाजाचा अविभाज्य घटक असते. समाज कुटुंब, धर्म, शिक्षण, व्यवसाय, उद्योग, राजकारण, अर्थकारण, कला, विविध शास्त्रे या सर्वांशी व्यक्तीचा कळत नकळत संबंध येत असतो. या सर्वांतून व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आकार घेत असते. व्यक्तीच्या मानसिक, बौद्धिक, शारीरिक क्षमता, स्वतःला अभिव्यक्त करण्याची पद्धती, व्यक्तीच्या प्रेरणा, प्रतिक्रिया, दृष्टिकोन, अनुभव या सर्वांच्या गोळाबेरजेतून व्यक्तिमत्त्व घडत असते.

- वुडवर्थ- व्यक्तीच्या संपूर्ण वर्तनाची गुणात्मकता म्हणजे व्यक्तिमत्त्व होय.
- बैरन- व्यक्तिमत्व म्हणजे इतरांपासून असलेल्या वेगळेपणातून स्पष्ट होणारे व्यक्तीच्या ज्ञानात्मक, भावनात्मक व शारीरिक वैशिष्ट्याचे संघटन होय. व्यक्तिमत्वाचे काही गुण असे असतात की ते सर्व क्षेत्रात प्रभावी ठरतात. उदा. संभाषणकला, नेतृत्वगुण, प्रामाणिकपणा, मनमिळाऊपणा, कामसूपणा.
- नॉर्मल एलमन व्यक्तीचा बांधा, क्षमता, गरजा, वर्तन, अभिरुची, अभिवृत्ती यांचे वैशिष्टपूर्ण संघटन म्हणजे व्यक्तिमत्व होय.
- आयॉक- व्यक्तीचा स्वभाव, शरीरयष्टी, चारित्र्य, बुद्धी यांचे संघटन म्हणजे व्यक्तिमत्व होय. व्यक्तिमत्वामध्ये व्यक्ती बाह्य व अंतरिक गुणवैशिष्ट्यांना महत्त्व आहे. 'दुसऱ्यांवर छाप पाडण्याची कला म्हणजे व्यक्तिमत्व.

• आलपोर्ट- 'व्यक्तीचे परिस्थितीशी समायोजन करणाऱ्या मनोशारीरिक क्षमतेच्या गतीशील संघटनाला व्यक्तिमत्व म्हणतात.

**व्यक्तिमत्त्व विकासातील महत्वाचे घटक**

१) **समाज :** व्यक्ती ज्या समाजात राहते, व्यवहार करते त्या समाजाशी व्यक्तीचा घनिष्ट सबंध असतो. तेथील समाजाची भाषा व्यक्ती वापरते. तसेच जो व्यवसाय करते, त्या व्यवसायाची भाषा व्यक्ती आत्मसात करते. व्यक्ती जी भाषा वापरते, जो व्यवसाय करते, त्यावरूनही व्यक्ती-व्यक्तीत फरक पाहायला मिळतो. म्हणून सामाजिक स्तराला व्यक्तीमत्त्वामध्ये महत्वाचे स्थान आहे.

२) **आर्थिक घटक:**-व्यक्तीच्या बोलण्यातून तिच्या कृतीतून आर्थिक स्तर डोकावत असतो. राहणीमान, वर्तन, सवयी यावरूनही व्यक्तिमत्त्व घडत असते.

३) **बौद्धीक क्षमता :-** बोलताना, वागताना, व्यक्तीची बौद्धिक क्षमता लक्षात येते. तिची आकलन क्षमता, तिचे संभाषण कौशल्य, तिची भाषा यातून व्यक्तिमत्त्वाची कल्पना येते.

४) **अभिवृत्तीः-** व्यक्तीच्या बोलण्यातून शब्दांच्या निवडीतून तिची अभिवृत्ती व दृष्टिकोन व्यक्त होतो. त्यातून व्यक्तीचे व्यक्तिमत्व गुणवैशिष्ट्यांसह व्यक्त होते. व्यक्तीचे व्यक्तिमत्व व्यक्तीच्या वयाच्या वेगवेगळया अवस्थांमधून विकसित होत जाते.

**१.२ व्यक्तिमत्त्व विकासाचे जीवनातील स्थान व महत्त्व**

व्यक्तिमत्त्व विकास

व्यक्तीच्या सर्व पैलूंवर संशोधनाद्वारे सविस्तर माहिती मिळवता येते. या माहितीचे पृथ्थकरण करून व्यक्तीच्या मूलप्रवृत्ती व परिस्थिती यांचा परस्परक्रिया-प्रतिक्रियांचा अभ्यास करून व्यक्तिविकासाचा आढावा घेता येतो. त्यातून मिळालेल्या निष्कर्षातून व्यक्तीचा अधिक चांगला विकास व्हावा म्हणून मार्गदर्शनपर सूचना करता येतात. यालाच 'व्यक्तीवृत्त' तयार करणे म्हणतात. पदनिश्चयन श्रेणी, प्रश्नावली, प्रसंगिके, मुलाखती या साधनांचा उपयोग व्यक्ती मूल्यमापनासाठी करण्यात येतो.

व्यक्तिमत्त्व विकासात सर्वांगीण विकास अभिप्रेत असून व्यक्तीच्या सर्जनशीलतेला वाव मिळून सद्भिरुचिसंपन्न व आनंददायक जीवन जगण्याची संधी मिळणे ही गोष्ट ग्राह्य धरली जाते. व्यक्तीला आपला विकास करून घेण्याचे स्वातंत्र्य देणे आणि कर्तव्याची जाणीव देणे, संधीची समानता देणे, आविष्काराला वाव देणे, सांस्कृतिक विकासाला गती देणे यामुळे सर्वांगीण विकास होतो.

'व्यक्तिमत्त्व' ही मानसशास्त्रीय संकल्पना असून व्यक्तीच्या वर्तनाचा अंदाज बांधता येतो. व्यक्तिमत्व हे जसजसे अनुभव येतील तसे तसे बदलत असते. शरीराची ठेवण, अनुवंश यांचे अस्तित्व बदलता येत नाही. व्यक्तिमत्व हे विविध गुणांचे संतुलन असते. ते सातत्याने बदलत असते. प्रत्येक व्यक्तीची घडण व्यक्तिगत असते. व्यक्तीची वागणूक व तिची विचारशक्ती यातून व्यक्तिमत्त्वाची इतरांशी ओळख होते. प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्व भिन्न असते. एक व्यक्ती दुसऱ्यासारखी नसते. यश मिळवण्यासाठी आणि त्यातून स्वतःचा विकास साधण्यासाठी प्रत्येक व्यक्ती धडपडत असते. त्यासाठी काही गुणांची आवश्यकता असते. जीवनातील यशाचे खरे रहस्य अनेक घटकांमध्ये सामावलेले असते. व्यक्तिमत्व सिद्ध करण्याचे महत्त्वाचे प्रभावी साधेन म्हणजे शरीर होय. व्यक्तीच्या जन्मजात क्षमता, गतअनुभव व अध्ययनातून व्यक्तिमत्व वैशिष्ट्यांची निर्मिती होत असते.

**व्यक्तिच्या सर्वांगीण विकासातील महत्त्वाचे घटक**

**१) बहिर्मुखता -** या गुणविशेषात बडबडेपणा, उत्साहीपणा, समाजप्रियता, कनवाळूपणा, मनमोकळेपणा या विरुद्ध शांतता, संयम, नियमितपणा, एकांतप्रियता, दुबळेपणा या गुणविशेषांचा समावेश होतो. बहिर्मुख व्यक्ती या कृतिशील आणि बोलक्या असतात. स्वभावाने आनंदी असतात. उत्साही आणि आशावादी असतात.

**२) सहमतीदर्शक व्यक्ती -** ही व्यक्ती दयाळू, सुस्वभावी, सहकार्य करणारी, सचोटीने वागणारी व परोपकारी वृत्तीची असते.

**३) जाणीवयुक्त तत्परता -** या व्यक्तीचे विचार सुसंघटीत, निटनेटके, ध्येयासक्त, जबाबदारीची जाणीव, स्वयंअनुशासन, विवेकनिष्ठता हे गुणविशेष असतात.
**४) समतोलपणा -** अशी व्यक्ती शांत, संयमी असते. बुद्धीमत्ता, मनमोकळेपणा, जिज्ञासूवृत्ती, सुशील, सभ्य, सौंदर्यादृष्टी इ. घटकांचा समावेश होतो.

**व्यक्तिमत्त्व विकासाची पंचसूची**
१) नवीन ज्ञान, माहिती मिळवणे.
२) खरे बोलणे
३) स्वनियंत्रण
४) चूक कबूल करणे
५) आश्वासन पाळणे.

**ज्ञान व्यवस्थापनाचे महत्व**

ज्ञानप्राप्ती हेच मानवी उन्नतीचे सर्वोत्कृष्ट साधन आहे. ज्ञान हे श्रेष्ठत्वाचे प्रमाण आहे. म्हणून ज्ञानाने समृद्ध आणि श्रीमंत होणे हे आपले कर्तव्य आहे. त्याशिवाय आपले कर्तृत्व सिद्ध होत नाही. ज्ञान मिळाले की ज्ञानी, पंडित, विद्वान समजला जातो. अर्थ, वित्त, शिक्षण, पर्यावरण, उद्योग, सेवा, माहितीतंत्रज्ञान, बाजारक्षेत्र, पतसंस्था, बँका, प्रशासन या क्षेत्रात ज्ञान व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. उत्पादन, सहकार, सेवा क्षेत्रातही संवाद कौशल्य व नेतृत्व, सादरीकरण कौशल्यांना महत्व आहे.

मानवी जीवनात ज्ञान हे सर्वश्रेष्ठ असून ज्ञानाइतके पवित्र मंगल व उपयुक्त दुसरे काही नाही. ज्ञान हे कर्मशील असावे. जनसंपर्कात असताना भाषिक प्रभुत्व, सरळ सोपी भाषाशैली, उत्तम वर्तवणूक हे गुण विशेष योग्य ठरतात.

आध्यात्मिक, व्यावहारिक, शैक्षणिक, वैज्ञानिक, व्यावसायिक, तांत्रिक क्षेत्र हे ज्ञानाचे स्त्रोत आहेत. संगणकीय क्रांतीमुळे व भ्रमणध्वनीमुळे जग जवळ आले आहे. माहिती तंत्रज्ञानात ई- बिझनेस, ई-कॉमर्स, ई-बुक, एज्युकेशन असे व्यवस्थापन अस्तित्वात आले आहे. जगभरात रोजगाराच्या, नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्यासाठी व्यावसायिक कौशल्याचा पाया बळकट पाहिजे. ज्ञानाचा हेतू आनंद हाच आहे. ज्ञानाचे अंतिम लक्ष्य सुंदर चारित्र्य निर्माण होणे हेच असते. ज्ञानसाधना करताना ज्ञानाची अंतिम परिणती भूषणात व्हावी. जीवनाचे वाळवंट किंवा नंदनवन करण्याचे विलक्षण सामर्थ्य वाणीत आहे. म्हणून बोलण्यात बुद्धिमत्ता, सावधानता, कुशलता व चातुर्य असावे. अशा व्यक्तीचे व्यक्तिमत्व लोकप्रिय बनते.

**ताण तणावाचे व्यवस्थापन व व्यक्तिमत्त्व विकास**

आजच्या स्पर्धेच्या युगात युगात ताण व चिंता यामुळे माणसाचे संतुलन बिघडते म्हणून ताणतणावाचे व्यवस्थापन केले तर जगणे सुसह्य होईल. परिस्थितीचे समायोजन साधणे स्वतःच स्वतःला धीर देऊन मनाला सावरण्यासाठी संत, सद्गुरूंचे विचार आत्मसात करून मनावर नियंत्रण ठेवावे. ताण ताणाव होणार नाही म्हणून माणसांशी संवाद साधावा, भांडणतंटे, वाद विवाद टाळावेत. सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा. ध्यानधारणा, धार्मिक ग्रंथवाचन, योग प्राणायाम असे छंद जोपासून मानसिक स्वास्थ्य मिळवावे. 'स्व' वर विश्वास ठेवून वेळेचे, जबाबदारीचे नियोजन करून श्रम विभागणी केली तर स्वास्थ्य लाभते.

'मन करा रे प्रसन्न ! सर्व सिद्धीचे कारण ! या संत तुकारामांच्या उक्तीचा विचार करून जगावे.
यश-अपयश, कलह, नात्यातील ताण, विवाहातील अपयश, नैराश्य, परीक्षेत अपयश, फसवणूक, आजार, मोठ्यांच्या समस्या, आर्थिक तंगी, एकाकीपणा यामुळे ताणतणाव येतो. शरीरप्रकृती सांभाळून, वास्तवाचे भान ठेवून वेळेचे व्यवस्थापन करावे. निसर्गाशी, प्राण्यांशी, नातेवाईकांची मैत्री करावी, विविध छंद जोपासावेत, आपले दुःख मनात ठेवून आनंदी वृत्तीने जगात वावरावे लागते. शारीरिक मानसिक स्वास्थ्य

सांभाळावे, आत्मविश्वास व जिद्दीने प्रसंगाला सामोरे जावे, विधायक कार्यात मन गुंतवावे. सत्य, निष्ठा व प्रामाणिकपणा ही मूल्ये जोपासावीत. काळजी घेतल्याने काळजी करावी लागत नाही. क्षमतेपेक्षा अधिक महत्त्वाकांक्षा बाळगणे ही चूक आहे. हेकेखोरपणा, संशयीवृत्ती चिडचिडेपणा, तापट स्वभाव, नकारात्मक वृत्ती यापासून दूर राहावे. शाळा, कुटुंब, समाज यांनी व्यक्तीचे भावविश्व जपले पाहिजे. विवेकनिष्ठा, तारतम्यवृत्ती, समंजसपणा, सहकार्य, सहानुभूती यांचा अवलंब सर्वांनी करावा.

**१.३ व्यक्तीमत्त्वावर प्रभाव टाकणारे घटक**

व्यक्तिमत्त्वाचा मूळ गाभा जन्मताच व्यक्तीत अस्तित्वात असतो. एक वर्षाच्या नंतर व्यक्तिमत्वाची लक्षणे विकसित होऊ लागतात. वयानुसार व्यक्तिमत्त्वाला वैशिष्ट्यपूर्ण आकार येतो.

**१) कुटुंब/घरः-** कुटुंबातील व्यक्ती, आई-वडील, भावंडे, आजी, आजोबा यांच्या संस्कारातून मुलांची जडणघडण होत असते. एकुलते एक मूल असणे, आई किंवा वडिलांचा अकाली मृत्यू होणे, कुटुंबाची आर्थिक स्थिती चांगली किंवा वाईट असणे याचाही परिणाम व्यक्तिमत्व विकासावर होत असतो. आई-वडिलांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा मुलांच्या व्यक्तिमत्व विकासावर उमटत असतो. आई-वडिलांचे प्रेम, भावंडाचे प्रेम मुलांच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. कुटुंबातील व्यक्तीचे परस्पर संबंध, घरातील वातावरण सलोखा व प्रेम असेल तर व्यक्तिमत्व विकासाला ते पोषक ठरते. आई-वडिलांचे प्रोत्साहन, सहकार्य व्यक्तिमत्व विकासात महत्त्वाचे असते.

**२) शाळा व महाविद्यालयः** शाळा आणि महाविद्यालयाद्वारे मुलांचा बाह्य जगाशी संबंध येतो. शाळेतील मित्र, तेथील शिक्षक, वातावरण, अभ्यास, शिस्त, वक्तशीरपणा यांचा व्यक्तिमत्त्वावर परिणाम होतो. शिक्षकांचे व्यक्तिमत्व प्रभावी असेल तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा विद्यार्थ्यांवर उमटतो. शिक्षकांच्या कृतीचा, मित्रांचा नैतिकतेचा, व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडतो. आई-वडिलांप्रमाणेच शिक्षकांच्या गुणदोषांचा मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर इष्ट-अनिष्ट परिणाम होत असतो. शाळा, महाविद्यालयातील मित्रांचा प्रभाव व्यक्तिमत्व विकासाला कारणीभूत ठरतो. अभ्यास व अभ्यासेत्तर उपक्रमातून, मित्रांच्या परस्पर संबंधातून व्यक्तिमत्त्वावर चांगला परिणाम होत असतो.

**३) समाजः-** व्यक्तिमत्व विकासाला समाज हा घटक प्रभावित करीत असतो. व्यक्तीचा समाजावर व समाजाचा व्यक्तीवर प्रभाव पडत असतो. व्यक्तीचा दर्जा जन्मानुसार व व्यवसायानुसार ठरत असतो. समाजातील रूढी, परंपरा, चालीरिती, नीती, नियम याचा तिच्या जीवनशैलीवर प्रभाव पडतो. समाजाच्या प्रवाहाबरोबर व्यक्तीला चालावे लागते. काही प्रवाहाच्या विरुद्ध ही वाहतात. प्रस्थापित नियम चालीरिती व्यक्ती पाळते. काही व्यक्ती रुढी, परंपरांना चालीरितींना विरोध करतात. व्यक्ती आणि समाज यांच्या संघर्षाचे प्रसंग ही उद्भवतात. परंतु व्यक्तिमत्व विकासात समाजाचे महत्त्व पायाभूत असते. व्यक्ती ही समाजशील असते. भोवतालच्या समाजाचा इष्ट-अनिष्ट प्रभाव व्यक्तीवर पडत असतो.

**व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप**

व्यक्तित्त्व आणि व्यक्तिमत्त्व [individuality-personality] व्यक्तित्त्व यामध्ये स्वतंत्र व्यक्ती म्हणून अस्तित्त्व असते. व्यक्तित्त्व आपल्या जवळ असते. व्यक्तिमत्त्व हे साध्य करायचे असते. प्रयत्नाने त्याला फुलवावे लागते. विकसित करावे लागते. व्यक्तित्त्व जन्मजात असते. व्यक्तित्त्वाच्या सहाय्याने व्यक्तिमत्त्व विकसित होते. व्यक्तित्त्वाचा सर्वांगीण विकास हे व्यक्तिमत्त्वाचे प्रमुख ध्येय असते.

व्यक्तित्त्वात पुढील गोष्टींचा विचार मुख्यत्वे होतो.

१) लिंगभेद २) शारीरिक भेद ३) अनुवंशिकता ४) परिस्थिती ५) बौद्धिक फरक ६) स्वाभाविक फरक असे भेद व्यक्तिमत्त्वात असतात. याभेदांनुसार व्यक्तिमत्त्व घडत असते.

**१) व्यक्तित्त्व :- वर्तन, चारित्र्य इ.**

प्रत्येक व्यक्तीनुसार उपजतच गुणांचे वेगळेपण असते. हे गुणविशेष वेगवेगळी संधी मिळाली, की अविष्कृत होतात. चांगल्या सवयी व गुणविशेष यांना व्यक्तीविकासात फार मोठे स्थान आहे. वक्तशीरपणा, स्वच्छता, टापटीप, व्यवस्थितपणा, सहकार्यभाव, स्वार्थत्याग, खेळकरवृत्ती, सत्यवादीवृत्ती, चारित्र्यसंपन्नता

है गुण व्यक्तीशी निगडित असतात. शिष्टाचार, सौजन्य, माणुसकी या गोष्टी व्यक्तिमत्त्वाच्या भाग आहेत. छंद, आवड, अभिरुची, मनोरंजनाची साधने, श्रद्धा, सवयी, धार्मिकता या आधारे व्यक्तीच्या वर्तनावर प्रभाव पडतो. समाज, शिक्षण, संस्कार याद्वारे व्यक्तीवर प्रभाव पडतो. कला, क्रीडा, संस्कृती ही माध्यमे व्यक्ती जीवनाला वळण लावतात.

**2) व्यक्ती तितक्या प्रकृती**

सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, सहिष्णुता, संयम या गुणांच्या धारणेतून चरित्र घडते. सदसदविवेक बुद्धीने निर्णय घेऊन अंतिम क्षणापर्यंत श्रद्धेने, निश्चयाने, धाडसाने आचरण करणे म्हणजे चारित्र्य होय. प्रत्येक व्यक्ती स्वयंपूर्ण व इतरांहून वेगळी असते. व्यक्तीनुसार स्वभाव, बुद्धी, अभिरुची, आवड-निवड, प्रकृती, क्षमता वेगळी असते. व्यक्तीला त्या दृष्टीने शिक्षण देणे उत्तम आहे. व्यक्तीला स्वच्छता, टापटीप, वक्तशीरपणा, आचरणात आणण्याची सवय लावून व्यक्तिमत्त्वाला आदर्श दिशा मिळते. शिक्षणातून चारीत्र्याची जडणघडण होताना सत्यप्रियता, कर्तव्यदक्षता, सततउद्योग, सहानुभूती, सहकार्य, जबाबदारीची जाणीव या सद्गुणांचे पोषण होते.

**व्यक्तिमत्व विकास कलाविष्कार व छंद**

व्यक्तिगत आवड, पात्रता, आकांक्षा असेल तसे छंद जोपासले जातात. वाचन, वक्तृत्व, खेळ, नाट्य, अभिनय, कला, संगीत, लेखन, अभिनय असे छंद, आपली नोकरी व्यवसाय करून जोपासून विरंगुळा मिळवता येतो. नृत्य, गायन, वादन असे छंद जोपासून वेळेचा सदुपयोग करावा. त्यामुळे मानसिक स्वास्थ्य मिळते. या छंदाचेच रूपांतर प्राविण्य संपादन करण्यात होते. त्यामुळे व्यक्तिगत प्रगती होते.

**व्यक्तिमत्व व शिक्षण**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रमुख साधन आहे. शिक्षण ही जीवनभर सातत्याने निरंतर चालणारी प्रक्रिया असते. शिक्षणामुळे व्यक्तिमत्व विकसित होते. व्यक्ती समाजाभिमुख बनते. व्यक्ती कार्यक्षम घटक बनते. त्यामुळे सर्जनशील प्रवृत्तींचा विकास होतो. व्यक्तीच्या भावनात्मक व समाजशील जिवनाला वळण लावणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. शिक्षणामुळे नोकरी व्यवसाय, सत्ता, अधिकार मिळतात. त्यामुळे समाज मान्यता व प्रतिष्ठा मिळते. व्यक्तीचा सर्वांगीण विकास होऊन राष्ट्राची उन्नती होते. म्हणून व्यक्तीला समाजाचा कार्यक्षम घटक बनवताना तिला समाजातील विद्या, कलांचा परिचय करून देणे, ही जबाबदारी शिक्षणाने पार पाडायची असते. व्यक्ती ही उत्तम व्यक्तिमत्व संपादन करून आपला यथायोग्य विकास साधते.

**व्यक्तिमत्त्व आणि अभिरुची**

अभिरुची म्हणजे विचारपूर्वक अनुकूल संज्ञाप्रवाही प्रतिक्रिया असते. इतिहास, समाज, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, भूगोल, मानसशास्त्र याविषयी असणारे ज्ञान व्यक्तीचे अभिरुची समृद्ध व संपन्न करीत असतात. व्यक्तीची कृती यात औचित्याचे भान राखत ती अभिरुची उच्च दर्जा गाठते. सौजन्य संयम व औचित्य मिळून व्यक्तीच्या अभिरुचीचा दर्जा उंचावतो.

**व्यक्तिमत्त्व आणि नेतृत्व**

समाजातील व्यक्तिमत्त्व विकासात नेतृत्व गुणांना महत्त्वाचे स्थान आहे. त्यासाठी काही महत्त्वाचे गुण आवश्यक असतात. शिस्त, नियमितपणा, कल्पकता इतरांना बरोबर घेऊन जाण्याची वृत्ती, कष्टाळूवृत्ती, जिध्द, नाविन्यदृष्टी, उपक्रमशिलता कृतीशिलता, इतरांना प्रेरणा देणे, भाषण, संवाद, संभाषण कौशल्ये भाषेवर प्रभुत्व, वेळेचे भान असणे, बुद्धिमत्ता, वर्चस्ववृत्ती, समायोजनक्षमता सकारात्मक विधायक दृष्टिकोन, वैचारिकता, समुहभावनांची कदर करणारा, हजरजबाबीपणा, अनुभव समूह-वाक्यातुर्य, सहकार्यवृत्ती, सामाजिक बांधिलकी सदस्यांना उद्दिष्टपूर्तीसाठी विश्वास देतात हे गुण नेतृत्व गुण असतात. नेतृत्वाचा सत्ता व श्रेष्ठत्व ह्यांच्याशी घनिष्ट संबंध असतो. समूह सदस्यांशी मैत्री, परस्परांवरील विश्वास, एकमेकांविषयी आदर, परस्परांविषयी ओढ, सदस्यांच्या भावनांशी समरसता साधणे, संघटनेची स्थापना करणे, समूहाच्या कार्यपद्धतीचे स्वरूप ठरवणे त्याविषयी कार्याचा निर्णय घेणे. समुहाचे उद्दिष्ट्ये पूर्ण

करण्यासाठी समुह सदस्यांना प्रोत्साहन देणे, समूह मनोधैर्य कायम ठेवणे. या सर्व माध्यमातून नेतृत्व विकसित होते. नेतृत्वाजवळ लवचिकता असावी लागते. सर्वच क्षेत्रातील सुव्यवस्थेसाठी अनुशासनासह नेतृत्व आवश्यक आहे. नेतृत्त्वाच्या अभावी समूह विस्कळीत होतो. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी नेतृत्व आवश्यक आहे.

**व्यक्तिमत्त्व व आरोग्य**

आजच्या काळात आरोग्य संपन्न असणे गरजेचे आहे. मानसिक अस्वस्थता, अशांतता, कामात लक्ष न लागणे, चुका होणे, वरीष्ठांशी न पटणे यामुळे मानसिक आरोग्य बिघडते. ध्येयाप्रत जाण्यासाठी निसर्गाशी समतोल साधण्यासाठी प्रत्यक्ष शरीर प्रकृतीही महत्त्वाची आहे. आरोग्यसंपन्न व्यक्ती स्वतःसाठी, समाजासाठी, इतरांसाठी हवीहवीशी वाटते. आजारी, व्याधीग्रस्त व्यक्तीकडून अनुचित व अयोग्य कार्य घडते. उदा. ड्रायव्हर, वैमानिक यांचे कान, डोळे, कार्यक्षम असावेत. प्रत्येक क्षेत्रात मन व शरीर शुद्ध, सात्विक व आरोग्यसंपन्न हवे.

**घटक-२ व्यक्तिमत्त्व विकासातील भाषेचे स्थान**

**२.१) भाषा म्हणजे काय ?**

भाषेने सर्व मानवी जीवन व्यापले आहे. जन्मल्यापासून तर मृत्यूपर्यंत आपण भाषा वापरत असतो. संदेशाचे दळणवळण करणे, हे भाषेचे प्रमुख कार्य आहे. भाषा ही समाजाची वाहिनी आहे. आपले विचार, भावना, मते, अभिरुची, आपण भाषेच्या माध्यमातून व्यक्त करतो. भाषा ही शिकावी लागते. ती आत्मसात करावी लागते. भाषा अगोदर ऐकली जाते, नंतर ती अवगत होत जाते. भाषा हे संज्ञापनाचे प्रभावी साधन आहे. भाषा ही सामाजिक संस्था आहे तशी ती व्यक्तीगत आहे. मानवी मुखावटे बाहेर निघालेल्या ध्वनींचा समूह म्हणजे भाषा होय. भाषेशिवाय मानवाच्या संस्कृतीची कल्पना करता येत नाही. भाषेचा व मानवी जीवनाचा दृढ संबंध आहे. मानवी संदेश वाहिनीची व्यवस्था म्हणजे भाषा होय. भाषा ही ध्वनींनी बनलेली आहे. ती मौखिक स्वरूपाची क्रिया आहे.

**२.२) व्यक्तिमत्त्व विकासातील भाषेचे स्थान व महत्त्व**

मूल जन्माला आल्यानंतर एक वर्षापासून ते मातृभाषा शिकू लागते. मातृभाषेचा किंवा भाषेच्या संस्कारांचा खोल ठसा त्याच्या व्यक्तिमत्वावर पडलेला असतो. नंतरच्या काळात व्यक्तीने कितीही भाषा शिकली तरी व्यक्तीच्या भावना मातृभाषेतूनच व्यक्त होतात. बोलण्याची देणगी फक्त मानवालाच प्राप्त झाली आहे. त्यामुळे मानवाने निसर्गावर विजय मिळवला आहे. आपल्या बुद्धीच्या व विचारांच्या जोरावर त्याने आपले विचार, भावना, अनुभव लिहायला सुरुवात केली. त्यातून अनेक ग्रंथ लिहिले गेले, ते पुढील पिढ्यांना संस्कारीत करीत गेले. नव्या पिढ्यांनी नव्या अनुभवांची, विचारांची त्यात भर घातली. भाषेमुळे समाज घडला आणि समाजामुळे भाषा घडली असे म्हणता येते. व्यक्तिमत्व विकासात भाषेचे ज्ञान महत्त्वाचे आहे. भाषेमुळे नवे नवे विचार आत्मसात होतात. त्यामुळे विचारांना चालना मिळते. व्यक्तीचे भावविश्व त्यामुळे समृद्ध होऊन फुलते. भाषेमुळे बौद्धीक, सामाजिक, आत्मिक, विकासाला चालना मिळते. भाषेमुळे दुसऱ्याचे म्हणणे ऐकू शकतो. गरजा विचार, भावना भाषेद्वारे व्यक्त होतात. वैयक्तिक व सामाजिक व्यवहार भाषेमुळे सुकर होतात.

**२.२.१) भाषिक कौशल्य आणि व्यक्तिमत्व विकास**

वाचन, श्रवण, लेखन, संभाषण व भाषण ही भाषेची प्राथमिक कौशल्ये आहेत. या कौशल्याने विकास झाला तर व्यक्तिमत्व विकसित होते. भाषेचे ज्ञान व आकलन झाल्यानंतर भाषेचे कौशल्य आणि उपयोजन करता येते.

**अ) श्रवण कौशल्य -** भाषेची जी कौशल्य आहेत, त्यांचा पाया श्रवणावर अवलंबून आहे. जन्मलेले मूल प्रथमतः ऐकते आणि नंतरच बोलायला शिकते म्हणून भाषेचा पाया 'श्रवण' कौशल्यावर आधारलेला आहे.
श्रवण केलेल्या शब्दाचे, वाक्याचे व्यक्तीला आकलन झाल्यावर व्यक्ती त्याचा अर्थ लावते. प्रभावी श्रवण केल्यामुळे विचारांचे आदान प्रदान होते. श्रवण क्रियेत अवधानाला महत्त्व आहे. केवळ ऐकणे येथे मर्यादित नाही तर वक्त्याचा प्रत्यक्ष शब्द कष्टाने आत्मसात करणे आवश्यक आहे. म्हणून 'श्रवण' हे कौशल्य आहे.

**१) श्रवणप्रक्रियेत येणारे अडथळे**

श्रवणक्रिया ही श्रोत्यांकडून होते म्हणून वक्ता व श्रोता यांचा संवाद परिणामकारक होणे आवश्यक आहे. श्रवणक्रियेत कोणते अडथळे येतात ते पाहू.

• ध्वनी वहनातील अडचण.
• वक्त्याचा बोलण्याचा वेग.
• वक्त्याच्या आवाजातील दोष.
• नावडता विषय.
• वक्त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष.
• शरीराने वक्त्याकडे पाहणे मन मात्र भटकलेले असणे.
• वक्ता व श्रोता यांच्यात अवधान विचलीत करणाऱ्या गोष्टी घडत असतील तर.
• वक्त्याची योग्य तयारी नसणे.

श्रवण कौशल्य विकसित करणे

• वक्त्याकडे अवधान केंद्रित करणे.
• नवा विषय समजून घेणे.
• वक्त्याच्या विषयाचे मूल्यमापन योग्य करणे.
• मन विचलित करणाऱ्या घटकांकडे दुर्लक्ष करणे.
• महत्त्वाच्या मुद्द्यांचे टिपण काढणे श्रवणात एकाग्रता प्राप्त करणे.

**श्रवणाचे फायदे**

• व्यक्तिमत्व विकासासाठी.
• ध्येय ठरवण्यासाठी.

कौटुंबिक संवादासाठी.
समाजात परस्परसंबंध टिकवण्यासाठी.
अध्ययन करण्यासाठी.

**ब) संभाषण कौशल्य**

एकमेकांशी संपर्क साधण्याचे महत्त्वाचे कौशल्य म्हणजे संभाषण होय. आपण शब्दांनी, चिन्हाने किंवा हावभावाने एकमेकांशी सातत्याने संवाद साधत असतो. दोन किंवा अधिक माणसातील बोलीभाषेतील संवादाला 'संभाषण' म्हणतात. भाषा हे विचारविनिमयाचे प्रभावी साधन आहे. विचार, भावना, मते, दृष्टिकोन यांची देवाणघेवाण संभाषणातून होते. भाषा ही सामाजिक संस्था समाज जीवनाची प्रभावी 'वाहिनी' आहे. संभाषण प्रभावी होण्यासाठी सुरवातीला आपली भाषा अवगत पाहिजे. परिणामकारक बोलण्याच्या शैलीला उत्तम संभाषण म्हणता येईल. संवाद साधण्याची अनेक माध्यमे आहेत. त्याप्रमाणे आपण वेगवेगळया प्रसंगी आणि वेगवेगळया प्रकारे संभाषण करतो.

**प्रत्यक्ष संभाषणः-** या संभाषणात दोन व्यक्ती समोरासमोर असतात. उदा. शिक्षक-विद्यार्थी, डॉक्टर-रुग्ण, आई-मूल, वकिल-अशिल हे प्रत्यक्ष बोलत असतात.

**अप्रत्यक्ष संभाषणः-** फोन, रेडिओ, ईमेल, सीडी, कॅसेट अशा माध्यमातूनही संवाद किंवा संभाषण होत असते.

**औपचारिक संभाषणः** व्यवसाय किंवा व्यवहाराच्या निमित्ताने केव्हा केव्हा औपचारीक संभाषण करावे लागते. चर्चा, सभा, संमेलने, मेळावे, बैंक, विमा, मार्केटिंग याप्रसंगी ही औपचारिक संभाषण एकमेकांशी केले जाते.

**अनौपचारिक संभाषणः-** या संभाषणात हलके फुलकेपणा असतो. उदा. पती- पत्नी, मित्र-मित्र, मित्र-मैत्रीण, वडील-मुलगा, आई-मुलगी अशा विविध नात्यांमध्ये संभाषण होत असते.

**संभाषणाची वैशिष्ट्येः-** संभाषणासाठी साधी सरळ सुटसुटीत भाषा वापरावी लागते. संभाषणाचे मुद्दे प्रभावी असावेत. त्यात नेमकेपणा असावा. वेळ प्रसंग पाहून संभाषण असावे. व्यक्तीनुसार संभाषणाचे

स्वरूप बदलते. व्यक्तीच्या मनातील भावभावना विचार, कल्पना संभाषणातून व्यक्त होतात. संभाषणासाठी भाषा परिणामकारक आकलन सुलभ असावी. त्यासाठी योग्य शब्दांची निवड करावी. त्यात वास्तविकता व स्वाभाविकता असावी. संभाषणावरून संभाषणकर्त्याची बौद्धिक पात्रता, सांस्कृतिकस्तर, सामाजिकस्तर, भाव स्थिती लक्षात येते. संभाषण हा व्यक्तिगत कौशल्याचा विशेष आहे.

**क) वाचन कौशल्ये**

"वाचाल तर वाचाल" हे सुभाषित सर्वांना परिचित आहे. 'वाचन' ही निसर्गदत्त देणगी नाही. ते प्रयत्नाने मिळवण्याचे कौशल्य आहे. अभ्यास करणे, शिकवणे, मनोरंजन करणे, ज्ञान मिळवणे अशा विविध कारणांनी वाचन केले जाते. प्रकाशित साहित्य, वर्तमानपत्र, नियतकालिके, जाहिरात, कागदपत्रे, निवेदने, सूचना, पत्रिका असे आपल्या वाचनात येत असते.

**वाचनाचे फायदे**

१) आनंद मिळतो. मनोरंजन होते.
२) बहुश्रुतता वाढते.
३ ) कुतूहल व जिज्ञासापूर्ती होते.
४) शब्दसंग्रह वाढतो. शब्दांचे सूक्ष्म भेद कळतात.
५) शब्दांचा संदर्भानुसार अर्थ कळतो.
६) कल्पनाशक्तीला चालना मिळते.
७) ज्ञानवृद्धी होते.
८) संस्कृती व समाज कळतो.

**१.२) वाचनाचे स्वरूप**

वाचनासाठी बौद्धिक पात्रता, मानसिक घडण, शारीरिक क्षमता, वातावरण यांचा वाचन क्षमतेवर कमी अधिक प्रभाव पडतो.

• वाचत असताना शब्दाचा बोध अचूक झाला पाहिजे.
• आहे तोच शब्द जसाचा तसाच वाचला गेला पाहिजे.
• वाचनात सलगता असावी.
• जे वाचत आहेत, त्याचे आकलन होणे महत्त्वाचे आहे, शब्द, वाक्य आणि समग्र परिच्छेदाचा अर्थ आकलन झाला पाहिजे.
• वाचनात एकाग्रता असावी, कारण अवधान विचलित झाले तर अर्थ कळत नाही.

**१.३) वाचन कौशल्यावर परिणाम करणारे घटक:-**

> **वाचकाची प्रकृतीः-** वाचनासाठी शारीरिक प्रकृती सक्षम पाहिजे. डोळे, मान, पाठ, पोट दुखत असेल तर वाचण्यात व्यत्यय येतो.

> **मानसिक स्थितीः-** भांडण, कलह, वादविवाद, दुःख असे प्रसंग घडले असतील तर त्याचा वाचनावर परिणाम होतो.

> **एकाग्रता नसणेः-** वाचन करताना मनात वेगवेगळे विचार येत असतील तर वाचनाचा अर्थ लागत नाही.

> **शरीर स्थिर ठेवणे :-** वाचताना शारीरिक हालचालींमुळे वाचण्याची गती कमी होते. उदा. इकडे-तिकडे बघणे, हात-पाय हलवणे.

> **शब्द भांडारः-** आपण जे वाचत आहोत त्या भाषेतील शब्द आपणास आकलन होत नसतील तर वाचण्यात अडथळे निर्माण होतात.

> **आवडः-** परीक्षेसाठी व मनोरंजनासाठी आपण वाचन करतो. त्यात आवड निर्माण केली तर आनंद मिळतो.

> **आसनव्यवस्थाः-** वाचन करताना आपली बैठक व्यवस्था शरीराला अनुकूल असावी. नाही तर मानेला पाठीला त्रास होण्याची शक्यता असते.

**वाचनाचे प्रकार**

वाचनाचे मुखवाचन, प्रकट वाचन, फावल्या वेळातील वाचन, अध्ययन युक्त वाचन असे प्रकार करता येतात.

**१) प्रकट वाचनः** प्रकट वाचन म्हणजे दुसऱ्याला कळेल अशा मोठ्या आवाजात वाचणे होय. प्रकट वाचनात लेखकाचा विचार, भावना योग्य विरामचिन्हांसह वाचायला पाहिजे. शब्द व वाक्यांवर बलाघात देऊन, सुरावलीचा व सिमासंधीचा वापर करून योग्य तेथे आवाजात चढ-उतार करून, शुद्ध स्वरूपात आशय श्रोत्यांपर्यंत जसाचा तसा पोहोचवणे. त्यासाठी सुस्पष्ट व स्वच्छ उच्चार असायला हवेत. आपल्या आवाजाने ऐकणाऱ्याला आनंद वाटला पाहिजे. आवाजात माधुर्य व गोडवा असावा.

**२) मूकवाचनः-** न बोलता मनातल्या मनात केलेल्या वाचनाला मूक वाचन म्हणतात. अभ्यासासाठी, मनोरंजनासाठी व अर्थग्रहणासाठी असे वाचन उपयोगी ठरते. मूकवाचन करण्यासाठी शांतता असेल तर एकाग्रता प्राप्त होते व आकलन चांगले होते. मूक वाचनामुळे वाचनात गती येते.

**३) अध्ययनासाठी वाचनः** हे वाचन अध्ययनासाठी असल्यामुळे चिकित्सकपणे बारकाईने वाचन करावे लागते. त्यात मनन, चिंतन, उजळणी करून विचार करावा लागतो. वाचनाचे पुनर्वाचनही करावे लागते. हे वाचन व्यक्तिमत्व विकासाला पोषक ठरते.

**४) फावल्या वेळेतील वाचनः** ताणतणाव कमी करण्यासाठी, मनोरंजनासाठी, वेळ घालवण्यासाठी, मनाला प्रसन्नता मिळवण्यासाठी हा उत्तम उपाय आहे. या प्रकारच्या वाचनाने मन उदार होते. दृष्टी व्यापक होते. अनेक साहित्यिकांच्या साहित्यकृती वाचून व्यक्तिमत्वाला दिशा मिळते.

**ड) लेखन कौशल्य**

लेखन करण्यासाठी श्रवण, वाचन, मनन, चिंतन, करावे लागते. निवडलेल्या विषयाचे आकलन झाल्यानंतर त्याचे कौशल्याने उपयोजन करणे, ही लेखनाची पहिली पायरी आहे. लेखन का करायचे व कसे करायचे हे ठरवून लेखन केले जाते.

**लेखनाचे महत्त्व**

१) माहिती स्मरणात ठेवण्यासाठी.
२) माहिती दीर्घ काळ जतन करण्यासाठी व प्रसारित करण्यासाठी.
३) व्यवहारात सुकरता व सुलभता ठेवण्यासाठी.
४) आत्माविष्कारासाठी व स्वयंमूल्यमापनासाठी.

**लेखन कौशल्यातील अडचणी**

१) मानसिक तयारी नसणे.
२) आत्मविश्वासाचा अभाव.
३) कमीपणा वाटणे.
४) लिहिण्यायोग्य विषय जवळ नसणे.
५) विषयाबद्दल आनास्था.
६) वेळेचा अभाव.
७) लिहिण्याचे कष्ट नको.
८) लेखनाचे तंत्र माहिती नसणे.
९) शारीरिक अडचणी.
१०) लेखनासाठी योग्य वातावरण नसणे अपुरी जागा असणे.
११) संस्कार नसणे.

**उपायोजना**

१) मानसिक तयारी करणे.
२) आत्मविश्वास जागृत करणे.
३) लेखन विषयावर चिंतन, मनन करणे.
४) संदर्भ सामुग्री जमा करणे.
५) इतरांचे लेखन वाचून प्रेरणा घेणे, तंत्र समजून घेणे.
६) लेखन विषयावर लक्ष केंद्रित करावे.
७) पुरेसा वेळ व कष्ट करण्याची तयारी ठेवावी.

**लेखनासाठी महत्त्वाची कौशल्य**

लेखनासाठी भाषेचे ज्ञान, शब्दावर प्रभुत्व, मार्मिक शब्दांचा वापर, स्वच्छ व शुद्धलेखन, वळणदार हस्ताक्षर, व्याकरणाचे नियम माहीत असणे आवश्यक आहे. लेखनासाठी विषय नेमकेपणाने मांडला गेला पाहिजे.

**१) लेखनाची गती**:-लेखनाला गती आणायची असेल तर लेखनाच्या सरावा- बरोबर अभ्यासाची व वाचनाची सवय पाहिजे. जे लिहायचे आहे त्याचे आकलन झालेले पाहिजे. व्याख्यान ऐकत असताना मुद्दे लिहिणे. लेखनासाठी अगोदरच वाचन, मनन, चिंतन, केलेले असेल तर लेखनाला गती मिळते.

**२) सुलेखनाचे स्वरूपः**-सुटे, सुस्पष्ट, सुभाष्य, शुद्ध, डोळयांना सहज दिसणारे अक्षर म्हणजे सुलेखन. अक्षर एकसारखे असावे, दोन शब्दांत अंतर असावे, परिच्छेद असावेत. समास सोडलेला असावा. मुद्दे अधोरेखित करावेत. आवश्यक तेथे मुद्द्यांना क्रमांक द्यावेत. महत्त्वाच्या ठिकाणी रंगीत पेनाचा वापर करावा.

**श्रुतलेखन-श्रोत्याने लिहिलेले**

दुसऱ्याने सांगितलेले ऐकून, त्यांच्या आज्ञेवरून जसेच्या तसे लेखन करणे म्हणजे श्रुतलेखन. या लेखनात चुकीची भूमिका व प्रतिभा निर्माण होऊ नये. बोलणाऱ्याच्या मनातील उत्स्फूर्तभाव व जिवंतपणा टिकून राहावा. श्रोत्याला चुकीचे ऐकायला येणे, यामुळे श्रुतलेखनात दोष निर्माण होतात.

**लेखनाची प्रमुख अंगे**

बाह्यरचनाः- परीच्छेद, शब्द, वाक्यरचना शीर्षक, उपशीर्षक, शुद्धलेखन.
आशयः- लेखनातील वैचारिकता व भावनात्मक.
सुसंगतीः-विचारांची परिणामकारक व सुसंगती मांडणी.
आविष्कारः-विचार मांडण्याची पद्धत, भाषाशैली.

**परिणामकारक लेखनाची तत्वे**

- मुध्देसूदपणा.\
- सोप्या भाषेत शुद्ध लेखन.
- संगतवार विचार.

**इ) भाषण कौशल्य**

भाषण हे सभेपुढे केले जाते. भाषणाचा विषय अगोदर ठरलेला असतो. भाषण कुठे, केंव्हा, कोणासमोर, का करायचे, याचाही विचार झालेला असतो. भाषण समाजप्रबोधन, मनोरंजन, प्रशिक्षण अशा वेगवेगळया हेतूंनी केले जाते. वक्ता, विषय, श्रोते, प्रसंग, या चार घटकातून भाषण साकार होते. व्याख्या- भाषण म्हणजे सभा, संमेलन किंवा विशेष कार्यक्रमात आपले विचार सुस्पष्ट मुद्देसूद, परिणामकारक, साभिनय, श्रोत्यांसमोर व्यक्त करणे म्हणजे भाषण होय.

**भाषणाची तयारी**

भाषण ओघवते व प्रवाही करण्यासाठी अलंकार, सुभाषिते, कविता, म्हणी यांचा वापर केल्यास भाषण रसाळ होते. भाषणात सुटसुटीत वाक्ये, शुद्धभाषा असावी. महत्त्वाच्या घटना, प्रसंग, व्यक्ती यांचे निवेदन ठरवावे. काय बोलायचे व कसे बोलायचे, याचा सराव करावा. आशय व विषय नीट समजून

घ्यावा. श्रोत्यांवर प्रभाव पडावा म्हणून आवाजात चढ उतार, उत्स्फूर्तता, हावभाव, उदाहरणे, विनोद यांचा यथायोग्य वापर करावा. भाषणाचा मसुदा अगोदरच लिहावा. वेळेचे नियोजन करावे. श्रोत्यांचा वयोगट लक्षात घ्यावा. श्रोत्यांच्या डोळयात पाहून भाषण दिले पाहिजे. त्यासाठी आत्मविश्वास, सकारात्मक, दृष्टिकोन पाहिजे. भाषणाचा सराव करून चुका टाळाव्यात आणि उत्साहाने आनंदाने भाषण करावे.

**२.३) भाषा आणि व्यक्तीमत्त्व यांचा सहसंबंध**

**१) कार्यक्रम संयोजन कौशल्य**

मानवी जीवन सफल करण्यासाठी कौशल्यांची गरज असते आणि कौशल्य मिळवण्यासाठी चिकाटी व प्रयत्नांची गरज असते. आपले व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी फुलवण्यासाठी या कौशल्यांचा निश्चितच उपयोग होतो. सार्वजनिक जीवनात व्यक्तीला अनेक प्रकारच्या भूमिका कराव्या लागतात. आपल्या कार्यक्षेत्रातही विविध कार्यक्रम घेतले जातात. सार्वजनिक कार्यक्रमात ही आपल्या सहभाग महत्त्वाचा असतो. वेगवेगळया कार्यक्रमांचे संयोजन, नियोजन, सूत्रसंचालन करावे लागते. कार्यक्रमाचे निवेदन करणे यास व्यावसायिक मान्यता प्राप्त झाली आहे. कोणताही कार्यक्रम घेण्यापूर्वी कार्यक्रमाची आखणी झाल्यानंतर रूपरेषा करावी लागते. प्रमुख पाहुणे, वक्ता, उद्घाटक, अध्यक्ष, सन्माननीय उपस्थिती यावरही चर्चा करावी.

१) स्वागत
२) द्वीपप्रज्वलन
३) प्रास्ताविक
४) परिचय
५) सत्कार
६) मनोगत
७) अध्यक्षीय मनोगत
८) आभार अशा स्वरुपाची कार्यक्रम पत्रिका असते.

कार्यक्रमपत्रिका कार्यक्रमापूर्वी तयार करून घ्यावी.

**२) कार्यक्रमाचे प्रास्ताविक**

कार्यक्रमाच्या प्रमुख संयोजकांनी प्रस्ताविक करावे. त्यांना कार्यक्रमाचे प्रयोजन, हेतू कार्यक्रमाचे उद्दिष्टे, कार्यक्रमाची गरज, कार्यक्रमाचे स्वरूप स्पष्ट करावे लागते. त्यामुळे उपस्थितांना कार्यक्रमाची रूपरेषा कळते. प्रास्ताविक थोडक्यात करावे. कमी वेळात महत्त्वाचे मुद्दे सांगावे. अतिशयोक्ती अलंकारिक भाषा, बोजड भाषा, वाचाळपणा टाळावा. कार्यक्रमाचे आयोजक, प्रायोजक, विश्वस्त मंडळ यांचा उल्लेख करावा. अचूक शब्द, प्रभावी भाषा, संस्थेविषयीची महत्त्वाची माहिती, अचूक सुभाषित वापरून प्रमाणबोली त पाच ते दहा मिनिटात प्रास्ताविक करावे.

**३) सूत्रसंचालन**

एखाद्या कार्यक्रमाचे सूत्र ज्याच्या हातात असतात, त्याला सूत्रसंचालक म्हणतात. कार्यक्रमाच्या सर्व घटकांत समन्वय साधून सर्वांना जोडणारा आणि कार्यक्रमात विचार मंच व श्रोते यांच्यातील दुवा म्हणजे सूत्रसंचालक असतो.सूत्रसंचालनात सहजता, शैलीत नैसर्गिकता असावी.

**सूत्रसंचालनासाठी काही कौशल्य**

१) कार्यक्रमाचे स्वरूप आणि कार्यक्षेत्र लक्षात घ्यावे.
२) वाचन, मनन, चिंतन करावे.
३) प्रसंगावधान राखावे.
४) कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करावा.
५) उत्तम व्यक्तिमत्व असावे.
६) निवेदन कौशल्य असावे.
७) आवाजात गोडवा, उत्तम वक्तृत्व.
८) काव्य, गीत, म्हणी, सुविचार, सुभाषिते योग्य ठिकाणी वापरावे.

९) सांस्कृतिक सामाजिक आर्थिक शैक्षणिक राजकीय घडामोडींची माहिती असावी.
१०) ऐतिहासिक व वर्तमान संदर्भाची किमान जाणीव असावी.
११) प्रमाणभाषा अवगत असावी शब्दांची पुनरावृत्ती टाळावी हजरजबाबीपणाण असावा.
१२) समयसूचकता व औचित्याचे भान ठेवावे.

कार्यक्रम वेळेत सुरू करणे व संपवण्याची जबाबदारी सूत्रसंचालनाकावर असते. कार्यक्रमात स्वागत व सत्काराचा क्रम ठरवणे, कोणाच्या हस्ते कोणाचे स्वागत करायचे, मनोगताचा क्रम ठरवणे, आभार कोण मानणार हे सर्व कार्यक्रमाच्या पूर्वी ठरलेले पाहिजे. तांत्रिक बाबींमध्ये माईक, डायस, माईकचा प्रकार लक्षात घ्यावा. सभागृहात वातावरण निर्मिती करावी. कार्यक्रमाची रूपरेषा सांगणे. कार्यक्रमाची वैशिष्ट्ये, उद्देश, वेगळेपण, प्रमुख पाहुण्यांचे गुणवैशिष्ट्ये सांगून श्रोत्यांच्या मनात कार्यक्रमाविषयी उत्सुकता निर्माण करावी.

मान्यवर व्यासपीठावर उपस्थित झाल्यानंतर त्यांचे शाब्दिक स्वागत करून विचार मंचावर स्थानापन्न होण्याची विनंती करावी. त्यानंतर कार्यक्रमाविषयीचा उद्देश, अध्यक्ष प्रमुख पाहुणे, उद्घाटक यांचे नामोउल्लेख करून, त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करावे. काव्यपंक्तीने वातावरण निर्मिती करावी. प्रमुख व्यक्तींच्या नावाबरोबर त्यांचे पद व गुणविशेषांचा उल्लेख करावा.

प्रमुख पाहुणे यांचे व अध्यक्षांचे मनोगत ऐकण्यासाठी श्रोते उत्सुक असतात म्हणून तसे वातावरण निर्मिती करावी. आभारानंतर पसायदान किंवा वेदेमातरम गीताने कार्यक्रमाचा समारोप करावा. कार्यक्रमाचा प्रारंभ ते शेवटपर्यंतची धुरा सूत्रसंचालकावर असते.

**सूत्रसंचालनाचे प्रकार**

कार्यक्षेत्रानुसार कार्यक्रमांचे स्वरूप बदलत असते तरी काही बाबतीत सारखेपणा असतो. कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार सूत्रसंचालन बदलते. श्रोता, प्रेक्षक, विचार मंच, वक्ता, बदलतो. उदा. राजकीयसभा, कवीसंमेलन, चर्चासत्र, व्याख्यानमाला, परिसंवाद, शिबीर, निरोप समारंभ, पारितोषिक वितरण, संगीतमय मैफील, प्रकाशन सोहळा, स्पर्धा, सत्कार समारंभ, भूमिपूजन, श्रद्धांजली, लग्न समारंभ अशा कार्यक्रमानुसार सूत्रसंचालकाला बदल करावे लागतात. प्रासंगिक भाष्य वातावरण निर्मिती, निवेदन कार्यक्रमाचे स्वरूप पाहून करावे.

**४) परिचय**

कार्यक्रमासाठी उपस्थित प्रमुख पाहुणे, मान्यवर, अध्यक्ष यांची ओळख श्रोत्यांना करून द्यावी लागते. परिचयातून मान्यवरांचे कर्तृत्व व व्यक्तिमत्त्वाची ओळख श्रोत्यांना होते. परिचय अचूक व प्रभावी शब्दांत करून द्यावा. वैयक्तिक माहिती देणे म्हणजे परिचय नाही तर मान्यवरांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्याशी चर्चा करून मान्यवरांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाची ओळख करून द्यावी. परिचय कौशल्याने करून द्यावा. परिचयात पाहुण्यांचे नाव-जन्मगाव, दिनांक, शिक्षण, कर्तृत्व, व्यावसायिक दर्जा, विशेष प्राविण्य, छंद, असामान्य कार्य अशा क्रमाने परिचय करून द्यावा, अनुरूप म्हणी, वाक्प्रचार, सुभाषित, सुविचार, काव्य याचा वापर करण्याने परिणामकारकता परिचयात येते. परिचयात अतिशयोक्ती नसावी.

**५) स्वागत-सत्कार**

अलीकडे स्वागत-सत्काराचे बरेच प्रस्थ वाढले आहे. कोणाकोणाचा सत्कार करावा, याचे औचित्य संयोजकांनी ठेवावे. मोठ्या मान्यवरांपासून छोट्या मान्यवरांपर्यंत असा क्रम असावा. काहींचे शाब्दिक स्वागत करावे, आणि कंटाळवाणेपणा टाळावा. स्वागतासाठी नावाबरोबरच पदाचा ही उल्लेख करावा. विशेष कार्याचा उल्लेख व्यक्तीचा केला तर श्रोत्यांची उत्सुकता वाढते. स्वागत सत्कारासाठी हार, फुले, पुष्पगुच्छ, श्रीफळ, भेटवस्तु, शाल सन्मानपत्र यांचा उल्लेख ही अचूक करावा. सत्कार कार्यक्रम ५ते १० मिनिटात उरकावा. कोणाकोणाचे सत्कार, कोणाच्या हस्ते करायचे याचे अगोदरच आयोजकांशी विचारविनियम करून नियोजन केले पाहिजे.

**६) मनोगत**

कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले, सन्माननीय पाहुणे, निमंत्रित वक्ते, अध्यक्ष यांचे भाषणे ऐकण्या साठी श्रोते उत्सुक असतात. 'मनोगत' हा कार्यक्रमाचा मुख्य गाभा असतो. म्हणून मनोगत व्यक्त करणाऱ्या

व्यक्तीने थोडक्यात आटोपशीर, नेमकेपणाने भाषण करावे. कार्यक्रमातील भूमिकेनुसार मनोगत व्यक्त करावे. आपल्या भूमिकेनुसार मनोगताचा आराखडा तयार करावा.

वक्त्याजवळ उत्तम वकृत्व शैली असावी. काय सांगायचे, कसे सांगायचे कोणाला सांगायचे याचे अचूक ज्ञान असावे. आवाजात चढ-उतार, हावभाव, तळमळ, व्यक्त व्हावी. श्रोत्यांचा प्रतिसाद मिळवावा. कार्यक्रमाचे स्वरूप लक्षात घेऊन मनोगताची तयारी असावी. वाचन, मनन, चिंतन करून मनोगताचे लेखन करून ठेवावे. मनोगतात जिवंतपणा आणण्यासाठी उदाहरणे, दाखले, दृष्टांत द्यावेत. मनोगतासाठी किती वेळ दिला आहे त्यानुसार तयारी करावी. किमान २०- ३० मिनिटाचे मनोगत असू शकते, तेवढी तयारी ठेवावी. त्यात लवचिकपणाही येतो.

**७) आभार**

आभार हा कार्यक्रमाचा शेवटचा भाग असतो. आलेल्या मान्यवरांचे आभार व्यक्त केले जातात. आभार मानताना प्रमुख व्यक्ती त्यांचे पद यांचा उल्लेख करावा. आभाराची क्रमबद्ध यादी तयार करावी. आभाराची विशिष्ट शैली वापरावी. आभार मानणारी स्वतंत्र व्यक्ती असते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ज्यांचे सहकार्य लाभले, त्यांच्या नोंदी करून आभार मानावेत. कमीत कमी शब्दात जीवनावर भाष्य करणारे सुभाषित वापरून किंवा कविता वापरून आभाराचा कार्यक्रम संपवायचा आहे. आभारात पाल्हाळ नसावे. नेमकेपणा असावा. श्रोत्यांची मनस्थिती लक्षात घ्यावी.

अशाप्रकारे कार्यक्रमात संयोजन कौशल्य आत्मसात केल्यास आत्मविश्वास प्राप्त होतो. स्वतःचा नावलौकिक वाढू शकतो. यामुळे आपले व्यक्तिमत्व प्रभावी बनते. कार्यक्रमाच्या आयोजनात सूत्रसंचालन करणे, प्रास्ताविक करणे, परिचय करून देणे, आभार मानने या भूमिका करणारी संयोजक समिती असते.

---

**लेखी परीक्षा प्रश्नसंच**

**(३०० शब्दांत)-गुण-१५ (प्रत्येकी)**

प्रश्न -१ व्यक्तिमत्त्व म्हणजे काय हे सांगुन व्यक्तिमत्वाची संकल्पना स्पष्ट करा.
प्रश्न -२ व्यक्तिमत्त्वाच्या विविध व्याख्या सांगुन व्यक्तिमत्वाचे स्वरूप स्पष्ट करा.
प्रश्न -३ व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकणारे घटक स्पष्ट करा.
प्रश्न -४ व्यक्तिमत्त्व विकासाचे जीवनातील स्थान किंवा महत्त्व सांगा.
प्रश्न -५ भाषिक कौशल्ये कोणकोणती आहेत ते उदाहरण स्पष्ट करा.
प्रश्न-६ वाचन कौशल्याचे स्वरूप स्पष्ट करा.
प्रश्न -७ भाषा व व्यक्तिमत्त्व विकास यांचा सहसंबंध स्पष्ट करा.
प्रश्न ८- कार्यक्रम संयोजनातील कौशल्यांची चर्चा करा.
प्रश्न ९- प्रभावी सूत्रसंचलनाचे विशेष लिहा.

**टीपा लिहा. -५ गुण**

**(१०० शब्दांत)-गुण-५ प्रत्येकी**

१. व्यक्तिमत्त्व म्हणजे काय?
२. व्यक्तिमत्त्वाच्या कोणत्याही दोन व्याख्या लिहा.
३. व्यक्तिमत्व विकासात शाळा महाविद्यालयाची भूमिका
४. भाषेचे महत्त्व लिहा.
५. श्रवण कौशल्याचे स्वरूप लिहा.
६. संभाषण कौशल्याचे महत्त्व लिहा.
७. लेखन कौशल्याचे स्वरूप लिहा.
८. सूत्रसंचालकाच्या अंगी कोणते गुण असावेत, ते लिहा.

---

**संकलन** : डॉ. संजय शिंदे, मराठी विभाग, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर